VB-G RAM-G ग्रामसभा

# परिशिष्ट ब (सभेचे इतिवृत्त नोंदवहीचा नमुना)

दिनांक १ / ०१ / २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभा/मासिकसभा/महिला ग्रामसभा बैठकीचे इतिवृत्त नोंदवही

१) ग्रामपंचायत सोनी बु॥ ता. राहाता जि. अहमदनगर

२) सभेची वेळ - दु. १.०० | ३) सभेची तारीख १./०१/२०२६ | ४) सभेचे स्थळ ग्रा.पं. समोर

५) सभेची वेळ

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची नोंद (हुद्द्यासह)

१) मा.ना. श्री. शिवराजसिंह चौहान, केंद्रीय ग्रामविकास मंत्री

२) मा.ना. डॉ. राधाकृष्ण विखे पा. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य

७) सभेचे अध्यक्ष मान्यवर : ~~श्री.~~/सौ./श्रीमती कल्पना विठ्ठल मोड, सरपंच, ग्रा.पं. सोनी बु. यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या मासिकसभा/ग्रामसभा/महिला ग्रामसभेमधील उपस्थिती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | सभेस उपस्थित अधिकारी/कर्मचारी नांव | हुद्दा | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| अ. क्र. | सभेस उपस्थित पंचायत सदस्य/ग्रामस्थांचे नांव | भ्रमणध्वनी क्रमांक ई-मेल आयडी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

अ) वरीलप्रमाणे सभेस (संख्या लिहावी) ........................ (सदस्य) उपस्थित असल्याने कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष श्री./सौ./श्रीमती ........................ यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरूवात करण्यात आली.

अ) वरीलप्रमाणे सभेस पुरेसा कोरम नसल्याने कोरम अभावी सभा तहकुब करून सदरची सभा दि.    /    / २०२    रोजी ........................ वाजता घेण्यात यावी असे ठरले.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव | शेरे आणि तारखेसह ठराव अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| १ | | मागील सभा इतिवृत्त वाचून कायम करणे. | |
| | १ | मागील सभा दि. २६।१२।२०२५ चे इतिवृत्ताचे सभेत वाचन करण्यात आले. मागील सभेत झालेल्या विषयाप्रमाणे ठरावानुसार चर्चा इ. बाबत सभेत सविस्तर आढावा घेणेत आला. त्यानुसार करणेत आलेली कार्यवाही योग्य व बरोबर असल्याने इतिवृत्त सभेत कायम करण्यात आले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | | सुचक:- श्री. रामनाथ वैकुनाथ निखे पा. | |
| | | अनुमोदक:- सौ. दिपाली संजय निखे पा. | |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर | |
| २ | | विकसित भारत रोजगार व उपजिविका हमी (ग्रामीण) VB-G RAM-G अधिनियम २०२५ चे जनजागृती करणेबाबत. | |
| | २ | मा. संचालक पंचायत राज महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र. राग्रास्वअ / VB-G RAM-G ग्रामसभा / १८४५ / २०२५ दि. २२।१२।२०२५, जि.प. अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र. साप्रवि-२ ग्रापं-०६। ८६८। २०२५ अहिल्यानगर दि. २२।१२।२०२५ चे सभेत वाचन करण्यात आले. सदर केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे दि. १०।०१।२०२६ च्या विशेष ग्रामसभेचे आयोजन करून VB-G RAM-G अधिनियम २०२५ ची जनजागृती बाबतची माहिती सभेत देण्यात आली. | |
| | | केंद्रीय ग्रामीण मंत्रालय भारत सरकारचे मा. ग्रामविकास मंत्री मा. श्री. शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत आणि श्रीमती कल्पना विठ्ठल मेड, सरपंच ग्रामपंचायत लोणी बु यांचे अध्यक्षतेखाली | |

अ) वरीलप्रमाणे सभेस (संख्या लिहावी) .................... (सदस्य) उपस्थित असल्याने कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष श्री./सौ./श्रीमती .................... यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरुवात करण्यात आली.

अ) वरीलप्रमाणे सभेस पुरेसा कोरम नसल्याने कोरम अभावी सभा तहकुब करून सदरची सभा दि. / / २०२ रोजी .................... वाजता घेण्यात यावी असे ठरले.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव | शेरे आणि तारखेसह ठराव अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| | | ग्रामसभेचे कामकाजास सुरुवात करण्यात आली. पुर्वीच्या म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे रुपांतर विकसित भारत रोजगार व उपजिविका हमी (ग्रामीण) VB-G RAM-G अधिनियम २०२५ मध्ये झालेले आहे. योजनेच्या नविन स्वरुपाबाबत प्रचार प्रसार होणेसाठी आजच्या विशेष ग्रामसभेचे आयोजन करणेत आले आहे. आपल्या आजच्या ग्रामसभेचे संपुर्ण देशभरात प्रक्षेपण सुरु आहे. | |
| | | मा. केंद्रीय ग्रामविकास मंत्री महोदय मा. श्री. शिवराजसिंह चौहान यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधत खालील प्रमाणे माहिती VB-G RAM-G अधिनियम २०२५ बाबत दिली. | |
| | १) | संसदेद्वारे अलिकडेच मंजूर करण्यात आलेला विकसित भारत रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) VB-G RAM-G अधिनियम २०२५ हा देशातील ग्रामीण कुटुंबांसाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. | |
| | २) | या नव्या अधिनियमांतर्गत रोजगाराची हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली असून हा मेहनती ग्रामीण समाजासाठी अत्यंत महत्वाचा बदल आहे. | |
| | ३) | या अधिनियमाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. | |
| | i) | बेरोजगारी भत्याचा हक्क – पुर्वीच्या म. गांधी मनरेगा अधिनियमांतर्गत बेरोजगारी भत्ता मिळणे कठीण होते. मात्र VB-G RAM-G अधिनियम २०२५ अंतर्गत सर्व अडथळे दूर करण्यात आले आहेत. कामाची मागणी करूनही काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता आपोआप देय होईल. | |

अ) वरीलप्रमाणे सभेस (संख्या लिहावी) .................... (सदस्य) उपस्थित असल्याने कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष श्री./सौ./श्रीमती .................... यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरुवात करण्यात आली.

अ) वरीलप्रमाणे सभेस पुरेसा कोरम नसल्याने कोरम अभावी सभा तहकूब करून सदरची सभा दि. / / २०२ रोजी .................... वाजता घेण्यात यावी असे ठरले.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव | शेरे आणि तारखेसह ठराव अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| | | त्यामुळे रोजगाराचा हक्क प्रत्यक्षात कायदेशीर रित्या अंमलात येईल. | |
| | | ii) वेळेवर मजुरी अदा :- मजुरी अदा करण्यात होणाऱ्या विलंबाच्या तक्रारी लक्षात घेऊन आता मजुरी देण्यास उशिर झाल्यास प्रत्येक विलंबित दिवसासाठी भरपाई मजुरीसोबत दिली जाईल. यामुळे पारदर्शकता वाढेल. | |
| | | iii) ग्रामस्तरावर नियोजनाची स्वायत्तता :- आता कामाचे नियोजन ग्रामसभेतच ठरविले जाईल. ग्रामपंचायत विकसित ग्रामपंचायत आराखडा तयार करेल. त्यात ग्रामस्थांचा सहभाग बंधनकारक असेल. | |
| | | iv) कामांच्या चार प्रमुख श्रेणी | |
| | | १) जलसुरक्षा व जलसंवर्धनाशी संबंधित कामे | |
| | | २) ग्रामीण पायाभूत सुविधांशी संबंधित कामे | |
| | | ३) आजीविका संवर्धनाची कामे | |
| | | ४) हवामान बदल व प्रतिकूल हवामानाशी संबंधीत कामे | |
| | | ही चारही क्षेत्रे विकास, सशक्तीकरण, अभिसरण व शाश्वत आजीविकेचा पाया ठरतील. | |
| | | v) विभागीय समन्वय व पारदर्शकता :- सर्व ग्रामस्तरीय कामे विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅकमध्ये समाविष्ट केली जातील. यामुळे कामांची पुनरावृत्ती टळेल. विभागांमधील समन्वय वाढेल व भ्रष्टाचारास आळा बसेल. | |
| | | vi) शेती मजूर समन्वय :- राज्य सरकारला बियाणे पेरणी व कापणीच्या हंगामात एकूण ६० दिवस अधिसूचित करण्याचा अधिकार असेल. या कालावधीत या अधिनियमांतर्गत कामे घेतली | |

| ठराव नंबर | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव | शेरे आणि तारखेसह ठराव अमंलबजावणी |
|---|---|---|
| | आणार नाहीत, त्यामुळे शेतीकामे सुरळीत होतील. | |
| vii) | प्रशासकीय खर्च मर्यादित वाढ :- प्रशासकीय खर्चाची मर्यादा ६% वरून ९% करण्यात आली आहे. त्यामुळे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सेवा, प्रशिक्षण व क्षमतावृद्धीस मदत होईल. | |
| viii) | अधिकृत माहितीचे स्रोत :- या अधिनियमाची माहिती फक्त अधिकृत शासकीय स्रोतांमधून घ्यावी. आवश्यक माहिती पंचायत कार्यालयात मिळू शकते. | |
| ix) | सुरू असलेली मनरेगा कामे सुरक्षित :- मनरेगा अंतर्गत सध्या सुरू असलेली सर्व कामे सुरूच राहतील. कोणतेही काम थांबणार नाही. VB-G RAM-G अधिनियम लागू झाल्यानंतर नविन कामे या अधिनियमांतर्गत सुरू होतील. म्हणजेच अडचण नाही, तर अधिक संधी. | |
| x) | वाढीव लाभ :- VB-G RAM-G अधिनियम २०२५ पुर्णपणे लागू झाल्यानंतर लाभार्थ्यांना १२५ दिवसांचा रोजगार तसेच वाढीव मजुरी दराचा लाभ मिळेल. | |
| | येणेप्रमाणे माहिती सभेत देणेत आली. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. | |
| | सूचक :- श्री. गणेश रंगनाथ शिंदे पा. | |
| | अनुमोदक :- श्री. रविंद्र पवार घावटे पा. | |
| | ठराव सर्वानुमते मंजूर | |